# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.06.2024** **वारःरविवार**

---

1. आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आज पुणे शहरात दाखल होणार.
2. राज्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय, लाडकी बहीण योजनेचा शासनादेश पारित.
3. विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक जाहीर करण्याची विरोधकांची मागणी.
4. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरुन करणार 'मन की बात' आणि
5. वीस षटकांच्या जागतिक क्रिकेट स्पर्धेत भारताला विजेतेपद.

**पालखी**

आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आज पुणे शहरात प्रवेश करत आहे. दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी पुण्यनगरी सज्ज झाली आहे. भवानी पेठेतील विठोबा मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी तर नाना पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिरात संत तुकाराम महाराजांची पालखी मुक्कामी येईल. पालखी सोहोळ्यासोबत वैष्णवांचा मेळावा टाळ मृदुंगाच्या गजरात विठूनामाच्या गजरात सहभागी झाला आहे. सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनव्दारे पालखी सोहळ्यावर नजर ठेवण्यात येत आहे. मंगळवारी पहाटे दोन्ही पालख्या श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ होतील.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आळंदी इथं पालखी सोहळ्यात सहभागी होवून माऊलींच्या पादुकांच दर्शन घेतलं. यावेळी शिंदे यांच्या हस्ते आळंदी नगरपालिकेच्या वतीनं उभारलेल्या तुळशी वृंदावन वास्तुशिल्पाचं उद्घाटन करण्यात आलं. त्र्यंबकेश्र्वरहून पंढरपूरला निघालेल्या संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीचं काल अहमदनगरमध्ये स्वागत करण्यात आलं.

**अधिवेशन**

राज्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बातमीदारांशी बोलताना दिली. काही ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्राला जाऊन देवदर्शन घेणं आर्थिक अडचणीमुळं शक्य होत नाही. त्यामुळं ही योजना सुरु करण्यात आली असल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

महाराष्ट्र अंमली पदार्थमुक्त होईपर्यंत कारवाई सुरु राहणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. अर्थसंकल्पांत समाजातील सर्व घटकांना न्याय दिला आहे. निधीची तरतूद करूनच योजना आखल्या आहेत. लाडकी

बहिण या योजनेचा शासनादेश काढला असून उद्या 1 जुलैपासून सर्व पात्र माता भगिनींना दरमहा पंधराशे रुपये मिळणार आहेत. अडीच कोटींहून जास्त महिलांना याचा लाभ होणार असल्याचंही शिंदे यावेळी म्हणाले.

अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर चर्चा होऊन,आणि विनियोजन विधेयकाला राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर अर्थसंकल्पातील निधी खर्च करण्यासासाठी शासन निर्णय काढता येतो. ही प्रक्रीया डावलून मुख्यमंत्र्यांनी माझी लाडकी बहीण योजनेचा आदेश काढला. हा सार्वभौम सदनाचा हक्कभंग असल्याचं विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

पैसे पाच तारखेला

राज्यातील पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वेळीच मिळणं आवश्यक असून सर्वच विशेष सहाय्याच्या योजनांचे पैसे प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेला लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत दिली. आमदार बच्चू कडू यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता.

धामणा

नागपूर जिल्ह्यातील धामणा इथल्या एका कंपनीत झालेल्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना संबंधित कंपनी-व्यवस्थापनामार्फत 25 लाख रुपये आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून 10 लाख रुपये अर्थसाह्य देण्यात आलं आहे. याबाबत अधिक मदत देण्याबाबतच्या मागणीवर राज्यशासन विचार करेल अशी माहिती कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी काल विधानसभेत दिली.

विधानपरिषद

विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी काल विरोधकांनी विधान परिषदेत केली. गेले अनेक दिवस विधानपरिषदेचं सभापतीपद रिक्त असल्याचं शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील यांनी सांगितलं. तर यासंदर्भात उद्या सर्वपक्षीय आमदारांसोबत बैठक घेतली जाईल, असं संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी, गणेशमूर्ती घडवणाऱ्यांना महापालिकांकडून शाडूची माती मोफत उपलब्ध करून देणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका मागणीला उत्तर देताना सांगितलं. बेकायदेशीर जाहिरात फलकांवर निर्बंध लावण्यासाठी आवश्यकता भासल्यास संबंधित कायद्यात बदल केला जाईल असं मंत्री उदय सामंत यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं.

राज्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाची पुढची प्रक्रिया जनतेला विश्वासात घेऊन आणि स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधूनच केली जाईल अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम उपक्रम मंत्री दादा भुसे यांनी काल दिली. कंत्राटदारांच्या फायद्यासाठी हा महामार्ग केला जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला.

**मन कि बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमातून आज सकाळी 11 वाजता देश-विदेशातील लोकांसमोर आपले विचार मांडणार आहेत. मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर हा

पहिला तर एकंदर कार्यक्रमाचा हा 111 वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनसह, न्यूज ऑन ए आय आर या मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे.

**मोहोळ**

पुण्यातील लोहगाव विमानतळावरील नव्या टर्मिनलच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचं मनुष्यबळ गृहविभागाकडून मंजूर करण्यात आल्याची माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. नव्या टर्मिनलसाठी 222 विविध पदांना मंजुरी मिळाली असून हे टर्मिनल लवकरात लवकर सुरु होईल असं मोहोळ यांनी सांगितलं. धावपट्टी वाढवण्यासाठी शक्यता तपासणी सर्वेक्षणाला परवानगी, पार्किंग बेवर पार्क केलेलं विमान संरक्षण दलाच्या जागेत हलवणं आणि नवं टर्मिनल सुरु होणं या तीनही कामांसाठी मोहोळ यांनी पाठपुरावा केला होता.

**एकरुपया**

एक रुपयात पीक विमा योजनेच्या नावाखाली सीएससी केंद्रचालक किंवा अन्य कोणी शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची गय केली जाणार नाही असं कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.

**बीज प्रक्रिया**

सोयाबीनची उगवणशक्ती साठवणुकीमध्ये दिवसेंदिवस कमी होत असते. त्यामुळे उगवणशक्ती तपासल्याशिवाय बियाणे पेरणीसाठी वापरू नये, 75 ते 100 मीलिमीटर पाऊस झाल्यानंतर सोयाबीन बियाण्याची पेरणी करावी, सोयाबीन कीडरोग प्रतिबंध आणि उत्पादन वाढीसाठी बीजप्रक्रिया करावी, असं आवाहन पुणे जिल्हा कृषी पर्यवेक्षक रोहन शेटे यांनी केलं आहे.

**कश्यपी**

गंगापूर धरणामध्ये अवघा 17 टक्के साठा शिल्लक असल्यामुळं नजिकच्या कश्यपी धरणातून गंगापूर धरणासाठी कालपासून पुन्हा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. मात्र कश्यपी इथले ग्रामस्थ प्रकल्पग्रस्त असून त्यांच्या अनेक मागण्या मान्य न झाल्यानं त्यांनी पाणी सोडण्यास विरोध केला होता. या संदर्भात काल जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी ग्रामस्थांची बैठक घेतल्यानंतर हा विसर्ग सुरू करण्यात आला.

**क्रिकेट**

बार्बाडोस इथं वीस षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचा विश्वचषक भारतानं उंचावल्यामुळं प्रत्येक भारतियाला आषाढी वारीतल्या वारकऱ्यांसारखा आनंद झाला आहे. त्या आनंदाचा हा वृत्तांत प्रशांत जाधव यांच्याकडून...

**सुर्याकुमार यादवने डेव्हिड मिलरचा अफलातून कॅचच नाही तर मॅच जिंकून दिली. तब्बल 17 वर्षांनी म्हणजेच 2007 नंतर पुन्हा एकदा आय सी सी च्या वीस षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचा विश्वचषक भारताने उंचावला. साधारणपणे सहा महिन्यांपूर्वी विश्वचषकाच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यातील पराभवानंतर या विश्वचषकातील विजयाने प्रत्येकजण आनंदाने न्हाऊन निघाला. या स्पर्धेत एकही सामना न गमावता शेवटपर्यंत अपराजित राहून अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा 7 धावांनी पराभव केला. विराट कोहलीने या स्पर्धेत धावांचा दुष्काळ संपवत सर्वोच्च 76 धावा केल्या. ही ऐतिहासिक कामगिरी करून विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय वीस**

**षटकांच्या क्रीडाप्रकारातून निवृत्ती जाहीर केली. हेन्री क्लासेनच्या पाच षटकारांनी मात्र काल देशातील क्रिकेटप्रेमीना श्वास रोखून धरायला लावले होते. क्विंटन डीकॉक आणि डेव्हिड मिलर यांनी जिंकण्यासाठी जोरदार प्रयत्न केले मात्र भारतीय गोलंदाजांनी टिच्चून मारा करत विश्वचक खेचून आणला. हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह आणि अर्शदीपसिंगने यांचा यात मोठं वाटा होता. अनेक वर्षांचे स्वप्न पूर्ण होताना तमाम भारतीयांनी बघितले. विराट कोहलीला सामनावीर तर जसप्रीत बुमराहला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. 1983, 2007, 2011 आणि 2024 असा एकंदर चारवेळा भारताने विश्वचषक उंचावला आहे.**

**महिला**

महिलांच्या क्रिकेटमध्ये चेन्नई इथं दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरु असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघानं 6 बाद 603 धावांचा डोंगर रचून नवा विक्रम प्रस्थापित करत पहिला डाव घोषित केला. शेफाली वर्माच्या 197 चेंडूतील वेगवान 205 धावा, स्मृती मनधनाच्या 149 धावा तर जेमिमा रॉड्रीग्स, हरमनप्रीत कौर आणि रिचा घोष यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारतानं ही कामगिरी केली. दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या डावात 4 बाद 236 धावा झाल्या आहेत.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.